REGISTERED No. B 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ — पुणें, बुधवार, तारीख २७ जुलै, १९३८ — अंक ३०

## दि प्रॉव्हिन्शिअल बँक
### ऑफ अिण्डिया लिमिटेड
**स्थापना १९३६**

मुख्य कार्यालय: २२ / अ, हॉस्पिटल रोड, (सी. ॲण्ड. अेम् स्टेशन) **बंगळूर**

शाखा: मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, सुरत.

अध्यक्ष: **खानसाहेब हाजी अहमद कासम**, अेम. अेल. सी.
मॅ. डिरेक्टर: **अेस्. पी. ठाकर.**

**करण्ट डिपॉझिट अकाउण्टस्**: १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.

**सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस्**: ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयापर्यंत कितीहि वेळा पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करतां येतो.

**कायम मुदतीच्या ठेवी**: दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटीवर स्वीकारण्यांत येतात. ह्यासंबंधीची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.

अनुमती मिळालेल्या **कर्जरोख्यावर** हातउसन्या रकमा मिळतात.
सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.
अधिक माहिती मागवावी.

**एम. मोहन, एजंट,** १७ मेनस्ट्रीट पुणें.
**एच. जी. गद्रे, एजंट,** लक्ष्मीरोड, पुणें. २

**स्वतःचें मुलांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन**
त्यांचे आयुष्यांतील पुढील मार्गाची योग्य रीतीनें कालक्रमणा करण्याची तरतुद करून ठेवणें हें प्रत्येक विचारवंत मातापितरांचें आद्य कर्तव्य होय. वरील प्रकारची सोय, उत्तम रीतीनें, फक्त "**आयुर्विम्या**"चे योगेंच साधतां येते.

## कॉमनवेल्थ विमा कंपनी
## लिमिटेड, पुणें.

**ह्या सर्वश्रेष्ठ विमा संस्थेनें मुलांच्या शिक्षणाचे सोयीकरतां नवीन तऱ्हेचीं विद्यार्जनाचीं कोष्टकें सुरू केलीं आहेत.**

**ह्या बाबतींतील विशेष माहितीकरतां खालील पत्त्यावर लिहा.**

**रा. न. अभ्यंकर**
बी. ए. एलएल. बी.
**मॅनेजिंग एजंट.**

## The Co-operators' Book Depot.
9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.
**The Only Book Depot of its Kind in India.**
*Specialising in*
Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.
Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

## ६ टक्के मासिक आंवक ठेव
डॉन ऑफ इंडियाच्या नवीन योजनेप्रमाणें तारीख १-१०-३८चे आंत ठेव ठेवून फायदा मिळवा.
**जनरल म्यानेजर**—डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.



# विविध माहिती

### टाटा स्टील कंपनीच्या कामगारांस बोनस

टाटा आयर्न ॲन्ड स्टील कंपनीनें आपल्या कामगारांस तीन महिन्यांच्या पगाराइतकी रक्कम बोनस म्हणून देण्याचें जाहीर केलें आहे. चालू महिना संपण्याचे आंत हें बोनस कामगारांच्या हातीं एका रकमेनें पडेल.

### डेक्कन व्हर्नॅक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणें

वरील संस्थेनें १९३७-३८ सालांत ६१ मराठी पुस्तकांचें परीक्षण केलें, त्यांपैकीं २९ पुस्तकें बक्षिसास पात्र, २२ प्रशंसा-पत्र देण्यास योग्य आणि १४ बक्षीसास अगर आश्रयास अयोग्य ठरलीं. दक्षिणा प्राइझ फंडांतून एकूण ६०० रुपये बक्षीस देण्यांत आले.

### परदेशी मिठाची वाढती आयात

बंगालमध्यें परदेशी मिठाची आयात वाढत आहे.

### ग्वाल्हेर संस्थानचें अंदाजपत्रक

ग्वाल्हेर संस्थानास १९३८-३९ मध्यें २ कोटि, ३६ लक्ष रुपये उत्पन्न होऊन खर्च २ कोटि २८½ लक्ष रुपये येईल, असा अंदाज आहे.

### लष्करी अधिकाऱ्याचा पगार जप्त करतां येणार नाहीं

जानेवारी, १९३९ नंतर कोणत्याहि लष्करी अधिकाऱ्याचा हिंदुस्थानांत मिळणारा पगार त्याच्या कर्जाच्या फेडीसाठी जप्त करतां येणार नाहीं अशी दुरुस्ती कायद्यांत होणार आहे. अनेक हिंदी व्यापारी मंडळ्यांनीं ह्या दुरुस्तीस आपला तीव्र विरोध असल्याचें हिंदुस्थान सरकारास आणि ब्रिटिश सरकारास कळवलें आहे.

### ट्रेझरी बिलांवर १२ आ. ११ पै व्याजाचा दर पडला

हिंदी रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत १½ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १२ आ. ११ पै पडला.

### ऐनजिनसी देवघेव

इटली व जपान आणि मँचूकियो ह्यांमध्यें परस्पर ऐनजिनसी विनिमयाचा करार झाला आहे. इटलीनें सोयाबीन्स, मॅग्नेसाइट आणि तेलें ह्यांची आयात करावयाची असून त्यांचे बदली तेवढ्याच किंमतीची यंत्रसामुग्री आणि मोटारी ह्यांची जपान व मँचुकियो ह्या देशांकडे निर्गत करावयाची आहे.

### स्वस्त स्वदेशी रेडिओ

मद्रास सरकारनें आपल्या प्रांतांतील सर्व खेड्यांतून रेडिओ बसविण्याचें योजिलें आहे. स्वस्त रेडिओ सेट्सचें उत्पादन स्वदेशांत कसें करतां येईल, ह्याचा विचार तज्ज्ञांकरवीं चालू आहे.

### मुंबई प्रांतिक जंगल खातें

१९३६-३७ मध्यें मुंबई प्रांतांतील जंगल खात्यास ४७ लक्ष, ७२ हजार रुपये उत्पन्न मिळालें व खर्च २८ लक्ष, ७ हजार रुपये झाला. १९३५-३६ सालीं उत्पन्नाचे आणि खर्चाचे आकडे अनुक्रमें ५२ लक्ष, १० हजार रुपये आणि २४ लक्ष २४ हजार रुपये, असे होते.

### सुएझ कालवा

गेल्या वर्षी सुएझच्या कालव्यामधून आगबोटी गेल्या त्यांचें निवळ वजन साडेतीन कोटि टनांच्यावर भरलें. हा आकडा पूर्वीच्या सालाच्या मानानें पुष्कळ मोठा आहे.

### ब्रिटिश मोटारींच्या धंद्यास जकातीचें संरक्षण

जर्मन मालाची स्पर्धा आपणांस तीव्रतेनें बाधते अशी ब्रिटिश मोटारींच्या कारखानदारांनीं तक्रार केल्यामुळें कॉमन्स सभेनें त्यांस जकातीचें जरूर तें संरक्षण मिळण्याची सोय होण्यास मान्यता दिली आहे. संगीताचीं वाद्यें, मोठीं घड्याळें, इत्यादि जिनसांसहि वरील सवलत मिळावयाची आहे. ह्या धंद्यांतल्या लोकांस संरक्षण मिळवण्यासाठी आतां पार्लमेंटचा कायदा होण्याची आवश्यकता नाहीं. तज्ज्ञांच्या सल्ल्यानें सरकारास त्यांस वाटतें संरक्षण देतां येईल.

### केमालपाशाचा हुकूम

जुन्या तुर्की चालीरीती आणि व्यावहारिक रिवाज ह्यांस फाटा देऊन त्यांचे जागीं आधुनिक पद्धतीची स्थापना करण्याचे केमाल पाशाचे प्रयत्न जोरानें चालू आहेत. मालाच्या खरेदी-विक्रींत किंमतीबद्दल घासाघीस होतां कामा नये आणि जिनसांवर ठराविक किंमतींच्या चिठ्या लावलेल्या असल्या पाहिजेत असा हुकूम त्यानें काढला आहे.

### फोटोचा शोक

फोटोचा शोक असलेले पन्नास लक्ष लोक ग्रेटब्रिटनमध्यें स्वतःचा कॅमेरा बाळगतात आणि ते प्रतिवर्षी ऐंशी हजार मैल लांबीची फिल्म वापरतात. त्यांचा ह्या कामीं सुमारें सव्वा कोटि रुपये खर्च होतो.

### " आधी परोपकार, मग स्वार्थ "

परोपकाराचें ध्येय असणाऱ्या " रोटेरियन " लोकांच्या चार हजारांचेवर संस्था जगांत असून त्यांच्या सभासदांची एकूण संख्या सुमारें पावणेदोन लाख आहे.

### " जीवो जीवस्य जीवनम् "

शेतींचीं पिकें, फळझाडें इत्यादींचा नाश करणारे कीटक कोट्यवधि रुपये किंमतीच्या मालाचा नाश करतात. आधुनिक शास्त्रज्ञ ह्या कीटकनाशावर कीटक संहाराचा तोडगा काढीत आहेत. विशिष्ट निरुपद्रवी जातींच्या कीटकांची उत्पत्ति मोठ्या प्रमाणावर करून त्यांची फौज दुष्ट कीटकांवर सोडून दिली असतां ते शत्रूंचा फन्ना उडवतात. लायक अशा संरक्षक कीटकांचें सैन्य उभारण्यांत शास्त्रज्ञांचें कौशल्य असतें.

### अर्थशास्त्रज्ञांची परिषद

हिंदी अर्थशास्त्रज्ञांच्या वार्षिक परिषदेचें येतें अधिवेशन नागपूर येथें २९ ते ३१ डिसेंबर अखेर भरणार आहे.

### पगाराचे पैसे दारूंत जाण्यास प्रतिबंध

गिरणी कामगारांना ज्या दिवशीं पगार मिळतो, त्या दिवशीं व त्याचे दुसरे दिवशीं दारूचा खप विशेष होतो, असें मुंबई येथील दारूच्या विक्रीचे आंकडे सांगतात. हातांत आलेला पैसा त्यामुळें तात्काळ खर्च होऊन जातो आणि कामगारांचें अतिशय नुकसान होतें. एक हजार किंवा त्याहून अधिक कामगारांच्या गिरण्यांचे सुट्टीचे दिवशीं व त्याचे दुसरे दिवशीं मुंबई शहरांतील दारूचीं सर्व दुकानें बंद ठेवण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. ही योजना १ ऑगस्ट पासून अमलांत येईल.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रुपये |
|---|---|
| १०-७-३८ ते १६-७-३८ | ७५,६१,४९४ |
| १७-७-३८ ते २३-७-३८ | ४६,००,६३७ |
| २१-९-३१ ते २३-७-३८ | ३,१७,२३,६९,३५९ |

## अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ३६२ |
| २ अर्थशास्त्र का स्वार्थ-त्याग? ... ... | ३६३ |
| ३ घसरलेला रुपया कसा सावरणार? ... | ३६४ |
| ४ ऑस्ट्रेलियांत माणसांचा तुटवडा ... | ३६४ |
| ५ स्फुट विचार... ... | ३६५ |
| रिझर्व्ह बँक आणि शेड्यूल्ड बँका—लँकेशायरचें कापड कसें खपेल?—हिंद-ब्रिटन व्यापारी कराराची पार्श्व-भूमि—वाटाघाटी फिसकटल्या तर पुढें काय?—सहकारी इन्स्टिट्यूट आणि सरकार | |
| ६ हिंदुस्थानापुढील आर्थिक प्रश्न ... ... | ३६७ |
| ७ खेड व जुन्नर तालुक्यां-तील शेनकी सोसायट्या | ३६८ |
| ८ ग्रामोद्योगाला सरकार-कडून मदत ... | ३७० |
| ९ निवडक बाजारभाव... | ३७१ |


# अर्थ

बुधवार, ता. २७ जुलै, १९३८


## अर्थशास्त्र का स्वार्थशास्त्र?

(२)

व्यक्ती स्वार्थी असतात आणि प्रत्येक व्यक्तीनें स्वार्थ साधण्यांत समाजाचें आणि अखिल मानव जातीचें हित सहजच साधतें ह्या सिद्धांतावर परंपरागत अर्थशास्त्राची इमारत रचलेली आहे. "स्वार्थी प्रीति मनुजाची सहज ती" ह्या आधुनिक कवीच्या उद्गारांत सत्य आहे ह्यांत शंका नाहीं; परंतु व्यक्ती ह्या कुटुंब, गांव, शहर, प्रांत, आणि राष्ट्र ह्यांच्या घटक असतात आणि सामाजिक व्यवहारांत व्यक्तिस्वार्थ त्यांच्या हितसंबंधांनीं मर्यादित होत असतो. अर्थशास्त्र हें सामाजिक शास्त्र आहे, भौतिकशास्त्र नव्हे. ह्या कारणानें आर्थिक व्यवहारांचे परिणाम समाजावर व समाजाच्या दृष्टीनें कसें होतात, हें पहावें लागतें. राजकारणशास्त्रांतहि व्यक्ति-स्वातंत्र्यास ह्या तऱ्हेनेंच मर्यादा घातलेली आढळते. व्यापार आणि उद्योगधंदे ह्यांमध्यें व्यक्तींचा आणि गटांचा तात्पुरता फायदा झाला तरी एकंदर राष्ट्राची परिस्थिति पुढें काय होईल ह्याकडे समाजाच्या वतीनें सरकारास पहावें लागतें. कारण, दीर्घकालीन नफा-नुकसानींत राष्ट्रांतील सर्व घटकांस वाटेकरी झाल्यावांचून गत्यंतर नसतें आणि अन्य राष्ट्रीयांस त्याचें सोयर-सुतक कांहीं नसतें. व्यक्तिस्वार्थाचे ठिकाणीं राष्ट्रीय स्वार्थाची स्थापना करावी लागते, ती ह्याचमुळें. संरक्षक जकातींचे योगानें माल महाग होऊन जनतेस जादा खर्चाचा बोजा आज सहन करावा लागला तरी स्वदेशी धंद्यांच्या उत्कर्षामुळें होणाऱ्या राष्ट्रीय उन्नतीनें हें नुकसान भरून निघतें आणि राष्ट्र एखाद्या कुटुंबाप्रमाणें वागतें. ह्या विचारसरणीच्या आधारावर राष्ट्रीय आर्थिक धोरणाच्या तत्त्वाची उभारणी झालेली असून त्याचा स्वीकार जगांतील सर्व पुढारलेल्या राष्ट्रांनीं केला आहे. असें असतां हिंदी लोकांचे हातांत राजकीय सत्ता नसल्याकारणानें मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा चालू होईपर्यंत ब्रिटिशांचें अनियंत्रित व्यापाराचें धोरण ह्या देशांत अमलांत राहिलें.

प्रो. काळे ह्यांनीं आपल्या सोलापूर येथील व्याख्यानांत हिंदुस्थानच्या जकातीविषयींच्या धोरणांत इष्ट बदल महायुद्धानंतर आणि त्यांत आलेल्या अनुभवामुळें कसा घडून आला ह्याची माहिती दिली. युद्धांत जर्मनीचा पराजय झाला, ह्याचें कारण जेत्या राष्ट्रांनीं त्याची केलेली उपासमार हें होय. पुढें युद्ध झाल्यास कच्चा माल आणि खाण्याचे जिन्नस यांचा पुरवठा आपणांस अबाधित झाला पाहिजे ह्याविषयींची तजवीज, युद्धाचा अनुभव म्हणून इंग्लंडहि करूं लागलें. व्हर्सेइच्या तहाच्या अटी जर्मनीस पुऱ्या करतां येणार नाहींत अशा त्या अव्यहार्य होत्या हें अनुभवानें दिसून आलें आणि तें राष्ट्र खंडणीची भरपाई करतां यावी म्हणून निर्गत व्यापारास उत्तेजन देऊन आयात व्यापारावर नियंत्रण घालूं लागलें. जगांतील राष्ट्रांची परस्पर देवघेव मर्यादित होऊं लागली आणि भांडवलाची आयात-निर्गत थांबली. महायुद्धाचे काळांत हिंदुस्थाननें मेसापोटेमियांत माल पुरवून ग्रेट-ब्रिटनला सहाय दिलें होतें आणि त्यासाठी कित्येक हिंदी धंद्यांस सरकारास खास संरक्षण व उत्तेजन द्यावें लागलें होतें. राष्ट्रसंरक्षणासाठी अत्यंत महत्वाचे असे कांहीं उद्योगधंदे आहेत आणि त्यांस उत्तेजन दिलें पाहिजे, ही गोष्ट सरकारच्या ध्यानांत आली होती. अशा धंद्यांमध्यें लोखंड-पोलादाचा धंदा अत्यंत महत्वाचा होता. टाटांनीं पैसा खर्चून व परिश्रम करून त्या धंद्याची स्थापना केलीच होती. ह्या सर्व गोष्टींचा असा परिणाम झाला कीं, औद्योगिक संरक्षणाचें अनेकवार धुडकावून लावलेलें तत्त्व सरकारच्या गळीं उतरलें. स्वदेशी चळवळीचा आणि भारतीय अर्थशास्त्राचा हा प्रचंड विजयच होय. टारिफ बोर्डाच्या शिफारशीवरून पोलादाच्या व कागदाच्या धंद्यास जकातीचें सहाय कायदेमंडळानें दिलें. इंग्लंडमध्यें अलीकडे शेतीचा धंदा आणि रंग, साखर, आगबोटी इत्यादींचे कारखाने ह्यांस सरकारी सहाय दिलें जात असल्यानें हिंदी स्वदेशी धंद्यांस द्यावयाच्या संरक्षणाला होणारा विरोध मावळला आहे. साम्राज्य सरकार ब्रिटिश धंद्यांस सहाय देत असतां हिंदी धंद्यांस तें देऊं नये असें म्हणणें त्यास अशक्य झालें. जकातीच्या संरक्षणामुळें हिंदी कापडाचा धंदा चांगला सावरला आहे आणि स्वदेशी साखरेचा नवीन धंदा येथें निर्माण झाला आहे. इंग्लंडमध्यें बिटाच्या गड्ड्यांची साखर बनवली जाते, तिच्या सहायाप्रीत्यर्थ ५० कोटींच्यावर रुपये ब्रिटिश सरकारनें आपल्या तिजोरीमधून दिले आहेत. परदेशी साखरेवर जकात बसवण्यांत आली आहे, ती वेगळीच.

स्वदेशी साखरच वापरीन असा निश्चय करणारांस मागें ती मिळत नसे आणि ८ लक्ष टन साखर प्रतिवर्षी जाव्हामधून येत असे. आतां १० लक्ष टनांचे वर स्वदेशी साखर तयार होते. महाग स्वदेशी साखर वापरल्यामुळें जनतेस अधिक खर्च आला आणि सरकारचें आयात जकातीचें उत्पन्न बुडलें तरी देशांत स्वदेशी कारखाने निघाल्यानें शेतकरी, कामकरी, कारखानदार इत्यादींस काम मिळून देशाच्या नैसर्गिक संपत्तीचा उपयोग होण्यास किती सहाय मिळालें आहे हें पाहिलें पाहिजे. औद्योगिक उन्नतीच्या लाटेमध्यें सिमेंटसारखा धंदा कसा ऊर्जितावस्थेस आला आहे हें पहाण्यासारखें आहे. पंधरा वर्षांमागें तीन-चार लक्ष टन सिमेंट देशांत खपत असे, आतां तो खप चौपट झाला असून स्वदेशी कारखाने त्याचा सर्व पुरवठा करूं शकतात. इतर ठिकाणचीं उदाहरणें सोडलीं तरी सोलापूर जिल्ह्यांत कालव्याच्या पाण्यावर बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटनें साखरेचा नवीन कारखाना उभारला आहे, त्याची मला प्रत्यक्ष माहिती आहे. तीवरून, देशांतल्या सृष्टिदत्त साधनांचा उपयोग भांडवल, संघटन आणि संर-

क्षण ह्यांच्या जोरावर कसा करतां येतो आणि लोकांनीं केला पाहिजे हें सहज दिसून येतें असें मी म्हणूं शकतों. कोरडवाहू जमीनींत चांगली शेती कशी करतां येईल, ह्याविषयींचे प्रयोग सोलापूर शहराजवळ चालले आहेत हें त्याचेंच दुसरें उदाहरण आहे. त्यापासून तरी हाच बोध घ्यावयाचा आहे. ह्या जिल्ह्यांत जमीन वर्षानुवर्ष वाहून चालली आहे, तिचें संरक्षण करण्याचें महत्व आमच्या लक्षांत आलेलें नाहीं आणि शेतीची अनवस्था होत आहे. अशा रीतीनें राष्ट्रीय म्हणजे भारतीय अर्थशास्त्राच्या सिद्धांतांस अनुसरून सरकारच्या सहायानें हिंदी लोकांनीं आपली उन्नति घडवून आणली पाहिजे ह्याविषयीं संशय रहात नाहीं. पाश्चात्यांनीं मोठमोठे धंदे करावे आणि हिंदी लोकांनीं बिनफायद्याच्या शेतींत रखडत रहावें हा निसर्गाचा किंवा अर्थशास्त्राचा नियम नाहीं. आर्थिक व्यवहार स्वार्थमूलक असले तरी तो स्वार्थ व्यक्तिगत नसून सामाजिक आणि राष्ट्रीय असला पाहिजे ही खऱ्या अर्थशास्त्राच्या सिद्धांताचा आणि प्रत्यक्ष अनुभवाची शिकवण आहे आणि तीच प्रो. काळे ह्यांनीं आपल्या व्याख्यानांत श्रोत्यांस सोपपत्तिक व सोदाहरण दिली.

## घसरलेला रुपया कसा सावरणार ?

(३)

रिझर्व्ह बँकेचें " येणें " अथवा जिंदगी किती आहे हें दर्शवणारे आकडे ह्या विषयावरील मागील लेखांत दिले आहेत, त्यांवरून एक वर्षांत बँकेच्या सामर्थ्यांत किती घट झाली हें दिसून येतें. बँकेच्या ताळेबंदांतली जिंदगी घटली असतां तिच्या "देण्यां"त काय फरक झाला आहे तो खालच्या तक्त्यावरून दिसेल.

रिझर्व्ह बँकेस असलेलें देणें

( दशलक्ष रुपये )

| | | | |
|---|---|---|---|
| चलनी नोटा | १,९०२ | १,८०२ | -१०० |
| ठेवी | | | |
| सरकारी | ११३ | १९४ | + ८१ |
| बँकांच्या | २६७ | १४५ | -१२२ |
| एकूण | २,२८२ | २,१४१ | -१४१ |

जिंदगी किंवा येणें २४ कोटि रुपयांनीं कमी झालें, त्याबरोबर बाहेरचें देणें १४ कोटींनीं घटलें, म्हणजे त्यामानानें बँकेच्या निधीवरचा ताण हलका झाला. सोनें आणि विलायतेंतली रोख्यांची शिल्लक मिळून चलनी नोटांच्या एकूण किंमतीच्या ४० टक्के इतकी रकम झाली पाहिजे असा कायद्याचा निर्बंध आहे. " त्याच्या मर्यादेच्या आंत किती तरी आजची बँकेची वरील शिल्लक आहे, ह्यामुळें हुंडणावळ घसरली म्हणून गडबडण्याचें कारण नाहीं. तितका प्रसंग आलाच तर सरकारला दंड भरून कायद्यानें घातलेली मर्यादा ओलांडण्याचीहि तिला सवड आहे. आधुनिक पद्धतीच्या बँकिंगचा उपयोग व फायदा हिंदी जनतेस समजत नसल्यामुळें ह्या थरास प्रस्तुत प्रकरण येऊं देणें शहाणपणाचें होणार नाहीं " असें " एकॉनॉमिस्ट "चें मत आहे.

हुंडणावळ उचलून धरण्यासाठीं उपयोगांत आणावा लागणारा सोनें आणि विलायती रोखे ह्यांचा निधि इतका भक्कम आहे कीं त्यावर रिझर्व्ह बँकेस दोन वर्षें सहज काढतां येतील असें त्या पत्रास वाटत आहे. आर्थिक परिस्थिति सुधारून मंदीची लाट न हाटल्यास कांहीं बाबींचें सहाय बँकेस मिळण्याचा संभव आहे अशी त्याची अपेक्षा आहे. मंदी टिकली तर हिंदी जनतेची चांदीची आयात कमी होऊन सोन्याची निर्गत थोडीशी वाढेल असा अंदाज आहे. हुंडणावळ घटणें म्हणजे पौंड स्टर्लिंगच्या मानानें रुपया स्वस्तावणें होय. ह्याचाच अर्थ, सोनें महागणें असा आहे. सोन्यास रुपयांत अधिक किंमत आली असतां, तें जास्त प्रमाणांत बाजारामध्यें येऊन विलायतेस जाईल आणि हुंडणावळ दृढ होण्यास सहाय करील. त्यांतच स्टर्लिंग उतरेल तर ह्या प्रवृत्तीस जोर येईल. अशा तऱ्हेनें परिस्थिति अनुकूल होण्याचा संभव असतां हुंडणावळीस उचलून धरण्यासाठीं चलन मर्यादित करणें व व्याजाचा दर चढवणें इत्यादि कृत्रिम उपायांची योजना करूं नये असा " एकॉनॉमिस्ट"चा सल्ला आहे. हुंडणावळीचा दर योग्य मर्यादेंत थोडा वर-खालीं होऊं देण्याचें धोरण रिझर्व्ह बँकेनें अंमलांत आणलें असतें तर तो जरा उतरतांच अलीकडे गडबड झाली आहे, तशी ती झाली नसती असें त्या पत्राचें म्हणणें आहे. हिंदुस्थान सरकार आणि रिझर्व्ह बँक ह्यांच्यापाशी हुंडणावळ टिकवण्याचें भरपूर सामर्थ्य असल्यानें प्रस्तुत प्रकरणीं त्यांस विशेष कांहीं करण्याचें कारण नाहीं असा त्याचा ठाम अभिप्राय आहे. हेंच ब्रिटिश व हिंदी सरकारचें मत आहे, असें समजण्यास हरकत नाहीं. " हिंदी राष्ट्राचें उत्पादन, क्रयशक्ति व संपत्तीचा उपभोग ह्यांत वाढ करणें " हा सरकारचा अंतिम हेतु आहे, आणि तो साध्य होत आहे तोंपर्यंत सध्याचें चलनविषयक धोरण बदलण्याचें प्रयोजन नाहीं. ह्याच त्यांच्या मताबद्दल मुख्य वाद आहे. सिद्ध करावयाचा सिद्धांत अगोदरच गृहीत धरल्यानें हा हुंडणावळीचा वाद मिटावा कसा ?

## ऑस्ट्रेलियांत माणसांचा तुटवडा

ऑस्ट्रेलिया हा अफाट देश असून त्यांतील वस्ती मात्र तुरळक आहे. तेथील लोकसंख्या फक्त ६५ लक्ष आहे आणि ती वाढल्यावांचून राष्ट्रसंरक्षण व आर्थिक संवर्धन अशक्य आहे. ग्रेटब्रिटनमधून माणसें तिकडे पाठवावीं तर ब्रिटिश लोकसंख्या घटण्याच्या मार्गावर आहे. शिवाय, ऑस्ट्रेलियांत माणसांची संख्या वाढल्यास त्यांस काम मिळण्याचा प्रश्न उपस्थित होणारच. हा पेच सोडवण्यास कोणते उपाय योजावे ह्याविषयीं सूचना एका ब्रिटिश समितीनें केल्या आहेत. ब्रिटिश वंशाचे लोक ऑस्ट्रेलियांत जाण्यास मिळाले नाहींत तर त्या देशास पचवतां येतील अशा तत्सम वंशांच्या लोकांची भरती करणें आवश्यक आहे असें मत व्यक्त करण्यांत आलें आहे. कांहीं देशांत माणसांची गर्दी उडाली आहे तर कांहींमध्यें त्यांची वाण भासत आहे असा देखावा आज जगांत दिसत आहे. माणसांची समान वांटणी करून घेण्याची राष्ट्रांची तयारी मात्र नाहीं. स्वतःचा देश सोवळा ठेवून दुसऱ्यांच्या प्रदेशांत घुसण्याची हाव त्यांपैकीं अनेकांस आहे.

## डबक्यांतील साचलेलें पाणी किती दिवस पुरणार ?

यंग मेन्स पार्सी असोसिएशनच्या विद्यमानें मुंबई येथें सर एच. पी. मोदी ह्यांचें भाषण झालें, त्यावेळीं ते म्हणाले:-"पारशी लोक मागील पिढ्यांच्या भांडवलावर आज रहात आहेत. आजोबांनीं कष्टानें मिळविलेल्या पैशावर ते किती दिवस जगणार ! " हे उद्गार महाराष्ट्रीय मध्यम वर्गासहि लागू नाहींत काय ?

# स्फुट विचार

### रिझर्व्ह बँक आणि शेड्यूल्ड बँका

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि तिला जोडलेल्या "शेड्यूल्ड" बँका, ह्यांच्या परस्पर-संबंधाविषयीं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, सर जेम्स टेलर, ह्यांनीं मद्रास येथील आपल्या मुलाखतींत स्पष्टीकरण केलें. मद्रास प्रांतांतील अकरा शेड्यूल्ड बँकांनीं त्यांस आपलें म्हणणें एका पत्रकाचे द्वारा सादर केलें, त्यांत त्यांनीं त्रावणकोर बँकेच्या सहायास रिझर्व्ह बँक धांवली नाहीं ह्याबद्दल तीव्र निराशा व्यक्त केली होती. त्रावणकोर बँक बंद पडल्यामुळें इतर बँकांकडेहि पैशाची अचानक मागणी आली, ती पुरी करण्याचा त्यांनीं यत्न चालविला आहे; तथापि, रिझर्व्ह बँकेनें त्यांस मदत दिली नाहीं, तर त्या बँकेपासून इतर बँकांस काय फायदा ? असाहि सवाल त्यांनीं रिझर्व्ह बँकेच्या चालकांस टाकला होता. साउथ इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सनेंहि अशाच स्वरूपाची तक्रार केली होती आणि रिझर्व्ह बँकेनें आपल्या भूमिकेसंबंधीं खुलासा करावा, अशी मागणी केली होती. सर जेम्स टेलर ह्यांनीं विशेष तपशिलांत न शिरतां सर्वसाधारणपणें ह्या प्रश्नाची चर्चा केली. ग्रेट ब्रिटनमधील बँकिंगच्या पद्धतिप्रमाणें हिंदुस्थानांतहि बँकिंगसंबंधीं कांहीं रूढी निर्माण व्हाव्यात, असें त्यांनीं सुचविलें. रिझर्व्ह बँक ॲक्टांत ह्या बँकेस आवश्यक ते सर्व अधिकार दिलेले असल्यानें शेड्यूल्ड बँकेस मदत करण्याचे मार्गांत तिला कायद्याची अडचण येत नाहीं, हें त्यांनीं स्पष्ट सांगितलें. रिझर्व्ह बँक आणि शेड्यूल्ड बँका ह्यांचे संबंध ज्यास्त निकट व्हावेत, ह्या मुद्यावर त्यांनीं विशेष भर दिला. शेड्यूल्ड बँकांनीं आपले पैसे शक्य तितके हाताशीं आणि सहज उभे करतां येतील असे ठेवावे, असाहि सल्ला त्यांनीं दिला. शेड्यूल्ड बँकांस सहाय करण्यास रिझर्व्ह बँकेस कोणतीच अडचण जर वाटत नाहीं, तर त्रावणकोर बँकेचे दरवाजे बंद होईपर्यंत रिझर्व्ह बँकेनें काय केलें ? हा प्रश्न रहातोच. ह्या संबंधीं ती बँक खुलासा करील, अशी सर्वांची अपेक्षा होती. रिझर्व्ह बँकेनें त्रावणकोर बँकेस वाचविण्यासाठी कोणकोणती खटपट केली, हें तिनें सांगितलें असतें म्हणजे सर जेम्स टेलर ह्यांच्या वरील आश्वासनांचा पडताळा पहाण्यास मिळाला असता. रिझर्व्ह बँक सध्या त्रावणकोर बँकेच्या व्यवहारांबाबत चौकशी करीत आहे, अशावेळीं ह्या विषयासंबंधानें अधिक न बोलणेंच योग्य ह्या भावनेनें सर जेम्स ह्यांनीं मौन धरलें असावें असें वाटतें. चौकशी पुरी झाल्यावर ह्या प्रश्नावर रिझर्व्ह बँक प्रकाश पाडील, अशी अपेक्षा बाळगण्यास हरकत नाहीं. रिझर्व्ह बँकेचें हिंदी बँकिंगच्या क्षेत्रामधील स्थान कोणतें आहे, हें स्पष्ट होण्यास आणि त्रावणकोर बँकेच्या वास्तविक परिस्थितीचें जनतेस ज्ञान होण्यास त्यामुळें सहाय मिळेल.

---

### लँकेशायरचें कापड कसें खपेल ?

हिंदुस्थान आणि ग्रेटब्रिटन ह्यांचे मधील व्यापारी कराराचें भिजत घोंगडें अद्याप तसेंच पडून आहे. लँकेशायरमधील कपास कापडाच्या गिरण्यांस परदेशांत पूर्वीसारखें गिऱ्हाइक उरलेलें नाहीं, आणि ब्रिटिश कापडाची निर्गत सालोसाल घटत चालली आहे. ग्रेट ब्रिटनच्या परराष्ट्रीय व्यापाराचे दृष्टीनें ह्या निर्गतीचें महत्त्व मोठें असल्या कारणानें, लँकेशायरच्या धंद्याची पुनर्घटना हा त्या देशांत राष्ट्रीय महत्त्वाचा प्रश्न झाला आहे. लँकेशायरच्या गिरण्यांचें प्रभावी संघटन घडवून आणून त्यांच्या मालाची निर्गत वाढविण्याचा ब्रिटिश सरकारचा यत्न चालू आहे. तसेंच, हिंदुस्थानासारखें आपल्या हातांतील परंतु आतां जात चाललेलें मोठें गिऱ्हाइक त्यास पुनः गांठून देणें हें ओघानेंच प्राप्त होतें. १९२९ सालीं १ अब्ज, ३७ कोटि वार ब्रिटिश कापड हिंदुस्थानांत खपलें. १९३७ सालीं हिंदुस्थानांत फक्त ३५½ कोटि वार ब्रिटिश कापडाची आयात झाली. हा आकडा सालोसाल आणखी कमी होत जाणार हें स्पष्ट दिसत आहे. तेव्हां, वेळीच शक्य तो प्रयत्न करून हिंदी बाजारपेठेचा कांहीं भाग स्वतःकडे राखून ठेवण्याची लँकेशायरची खटपट आहे आणि ब्रिटिश सरकारचा त्यास पाठिंबा आहे. हिंदी गिरणीवाल्यांस आपल्या क्षेत्रांत ब्रिटिश कापडाची स्पर्धा अर्थातच नको आहे आणि त्यामुळें हिंदी व ब्रिटिश व्यापारी मंडळें ह्यांमध्यें तडजोड होऊं शकली नाहीं. व्यापारी कराराचा हा प्रश्न आतां हिंदुस्थान सरकार आणि ब्रिटिश सरकार ह्यांनीं स्वतःकडे घेतला आहे. तथापि हिंदी हितसंबंधीं लोकांशीं पुन्हां चर्चा होईल असें दिसतें.

---

### हिंद--ब्रिटन व्यापारी कराराची पार्श्वभूमि

"तुमच्या कपाशीस परदेशांत वाव नाहीं; आम्हीं तुमची कपास घेतों; तुम्हीं आमचें कापड घ्या " असें तेथील गिरणीवाल्यांचें हिंदी लोकांस सांगणें आहे. व्यापारी करारांतील मूल तत्त्व ह्या दृष्टीनें ह्या म्हणण्यांत वावगें कांहीं नाहीं. तथापि, तपशीलवार आकड्यांत त्यांनीं त्यांचें विवरण केलें, म्हणजे हिंदुस्थानास आणि ग्रेटब्रिटनला ह्या करारामुळें होणारा अपेक्षित एकूण नफा ह्यांत फार मोठी तफावत दिसते. हिंदी कपाशीच्या पांच लक्ष गाठींचे विनिमयांत लँकेशायरला पन्नास कोटि वार कापडाचा सौदा करावयाचा आहे. हें कापड हिंदुस्थानांत हमखास खपावें, ह्यासाठी आयात-जकातींत आवश्यक तेवढी कपात हिंदुस्थानानें करावी, असा त्यांचा आग्रह आहे. जपाननें ह्याच स्वरूपाचा करार हिंदुस्थानाशी केला होता, त्यावेळीं त्या देशानें कापडाची निर्गत आणि कपाशीची आयात ह्यांचे प्रमाणांत इतकी तफावत ठेवलेली नव्हती, हें लँकेशायरलाहि मान्य आहे. तथापि, ब्रिटिश कापड हिंदी कापडाशीं अनिष्ट स्पर्धा करणार नाहीं, असें त्यांचें आश्वासन आहे.

---

### वाटाघाटी फिसकटल्या, तर पुढें काय ?

लँकेशायरच्या गिरणीवाल्यांस हिंदुस्थानाशीं अनुकूल व्यापारी करार जितका सत्वर होईल तेवढा हवा आहे. हिंदुस्थान सरकारचे व्यापार-मंत्रि, सर महंमद झाफरुल्लाखान, हे सध्या ग्रेटब्रिटनमध्येंच असून, त्यांची आणि ब्रिटिश बोर्ड ऑफ ट्रेडची वाटाघाट चालू आहे. लँकेशायरचें शिष्टमंडळ हिंदुस्थानांत आलें होतें, त्यावेळीं हिंदी आणि ब्रिटिश विचारसरणी ह्यांमधील अंतर इतकें दीर्घ होतें, कीं तडजोडीच्या भाषेसहि तोंड फुटण्यास अवसर मिळाला नाहीं. " हिंदी कपाशीचा उठाव जपानमध्यें पूर्वीप्रमाणें होण्याचा यापुढें संभव नाहीं; युरोपांतहि हिंदी कपास खपणें आतां शक्य नाहीं; अमेरिकन कपाशीचें उत्पादन आणि तिचा उठाव हीं आतां वाढलीं असून दक्षिण अमेरिकेंत कपाशीची नवीन लागवड होत आहे. युरोपांतील कित्येक देशांनीं, आपलें परदेशांवरील अवलंबन कमी करण्यासाठीं, रेयॉनसारख्या कृत्रिम धाग्यांचें कापड विणण्यास प्रारंभ केला आहे. कपाशीची सर त्यांस येण्यास अद्याप अवकाश असला, तरी हिंदी कपाशीस त्यांची स्पर्धा जाणवल्या-

स्वीज म्हणणार नाहीं." अशी लँकेशायरची विचारसरणी आहे सध्या चालू असलेल्या वाटाघाटींत ब्रिटिश सरकारनें आपल्या मागण्या सौम्य केल्या, तरच हिंदी लोकांस त्या मान्य होणें शक्य आहे. हितसंबंधी हिंदी व्यापाऱ्यांचें सल्लागार मंडळ नेमून त्याचेमार्फत करारची बोलणीं चालविण्याचा उपक्रम प्रथम याच करारचे प्रसंगीं हिंदुस्थान सरकारनें केला, परंतु त्याबाबतची सरकारची अपेक्षा फोल ठरली आणि हिंदी कारखानदार आणि कापसाचे उत्पादक ह्यांच्या हितसंबंधांच्या विरोधाचा फायदा लँकेशायरला घेतां येणें अशक्य झालें. ह्यापुढची पायरी म्हणजे, सल्लागार मंडळाचें विसर्जन करून सरकारनें स्वतःच सर्व सुत्रें पुर्ववत् आपल्या हातीं घेणें, ही होय. असें झालें, म्हणजे हिंद-ब्रिटन व्यापारी करारावर सह्या होण्यास वेळ लागणार नाहीं आणि मध्यवर्ती असेंब्लीच्या मतासहि मान देण्याचें प्रयोजन उरणार नाहीं. ही पुच्छप्रगति सरकारास टाळावयाची असल्यास, त्यानें हिंदी लोकमताचाच पुरस्कार करणें आवश्यक आहे. हिंदुस्थानाचें हित पाहतांना सरकारनें व्यापारी वृत्ति दाखवून ब्रिटिश वर्चस्वाचें जूं शक्यतितकें दूर सारलें पाहिजे.

### सहकारी इन्स्टिटयूट आणि सरकार

प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटच्या वतीनें शिष्टमंडळानें नामदार श्री. मुरारजी ह्यांची भेट घेऊन सरकारनें त्या संस्थेच्या योजलेल्या घटनेबाबतचें आपलें म्हणणें पुढें मांडलें आणि स्वतःस अनुकूल असे फेरबदल तीमध्यें करण्यांत यावे असें सुचवलें. ह्या चर्चेतला दोन्ही पक्षांस मान्य झालेला म्हणून विशिष्ट माथितार्थ सरकाराकडून इंस्टिटयूटकडे आला. तो पहातां इंस्टिटयूटचें कार्यकारी मंडळ आणि कौंसिल ह्यांनीं तयार केलेल्या घटनेशीं विपरीत अशीं कलमें त्यांत होतीं आणि त्यांचे योगानें इंस्टिटयूट ही नामधारी संस्था होऊन बसावी असें त्यांचें एकंदर वळण होतें. इन्स्टिटयूटमध्यें लोकशाहीचें प्राबल्य असावें ह्या मताचे श्री. मुरारजी असल्याची प्रसिद्धी आहे आणि इन्स्टिटयूटचें शिष्टमंडळ भलतीच घटना मान्य करून येईल हें संभवनीय नव्हतें. मग हा वरील ग्रंथ लावावयाचा कसा? ह्या संबंधांत मंत्री आणि शिष्टमंडळ ह्यांचेमधील चर्चेचा निष्कर्ष करून तो सरकारी पत्रांत व्यक्त करणाराचा गैरसमज झाला असला पाहिजे असें आम्हीं मागें त्या विषयावर लिहितांना म्हटलें होतें आणि तेंच खरें आहे असें आतां विश्वसनीय रीत्या समजतें. हा विषय गेल्या शनिवारीं कार्यकारी मंडळापुढें आला असतां शिष्टमंडळाचे एक सभासद, श्री. चुनीलाल गांधी, ह्यांनीं ही गोष्ट स्पष्ट केली. त्यावरून, सरकारला पत्र लिहून इंस्टिटयूटची पूर्वीची योजना त्यां पुढें मांडावी आणि त्यांच्या आलेल्या पत्रांत सदरहु योजना उलटीपालटी कशी झालेली आहे हें निदर्शनास आणावें असें ठरल्याचें समजतें. असें झालें असतां गैरसमज नाहींसा होऊन श्री. मुरारजी ह्यांची इंस्टिटयूटच्या म्हणण्यास मान्यता मिळण्यास अडचण पडूं नये असा विश्वास आम्हीं मागें व्यक्त केला होता, त्याप्रमाणेंच इंस्टिटयूटच्या कार्यकारी मंडळानें ठराव केला आहे. ह्या भिजत पडलेल्या प्रकरणाचा निकाल लवकर लागणें इष्ट आहे.

### हुबळी को. लँड मॉर्गेज बँकेचा कारभार

हुबळी (जि. धारवाड) को. लँड मार्गेज बँकेच्या कारभाराची चौकशी सहकारी रजिस्ट्रारनीं सहकारी कायद्याच्या ४३ व्या कलमान्वयें करविली, तेव्हां बँकेच्या कामांत अनेक चुका आढळून आल्या. रजिस्ट्रारनीं बँकेच्या सध्याच्या डायरेक्टर बोर्डाचे जागीं नवीन बोर्डाची नेमणूक केली आहे.

### टाटा वीज कंपन्यांचें उत्पन्न

टाटा हायड्रो इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी, आंध्र व्हॅली आणि टाटा पॉवर सप्लाय कंपनी ह्या तीन विजेच्या कंपन्यांची एजन्सी मेसर्स टाटा हायड्रो इलेक्ट्रिक एजन्सीज लि. ह्या कंपनीकडे आहे. वरील तीन कंपन्यांच्या उत्पन्नाचे तुलनात्मक आकडे खालीं दिले आहेत.

| कंपनी | उत्पन्न ( रुपये ) वर्ष जुलै ते जून १९३६-१९३७ | | १९३७-१९३८ | |
|---|---|---|---|---|
| | लक्ष | हजार | लक्ष | हजार |
| टाटा हायड्रो | ४० | ४९ | ४१ | १५ |
| आंध्र व्हॅली | ५० | ५३ | ५० | ८३ |
| टाटा पॉवर | ७७ | ६७ | ९९ | २४ |

### "लोकशिक्षण"

वरील मासिकाचा मे-जून जोड अंक प्रसिद्ध झाला आहे. त्यांतील "हिंदुस्थान देश कां व कसा जिंकला गेला?", "चीन-जपानचा लढा," "आजकालचा गुजराथ व महाराष्ट्र" इत्यादि अनेक लेख उपयुक्त आणि वाचनीय आहेत. इतरहि विषयांवर चांगले लेख असून, एकंदर अंक नेहमीप्रमाणें भरदार आणि विविधतापूर्ण आहे.


## "कर्जाची पहिली वांटणी."

नियमानुसार ज्यांचे नंबर कर्जास पात्र झाले त्यांस तारणाची व्यवस्था करून कर्ज घेऊन जाण्याबद्दल कळविण्यांत आलें आहे. पुढील वांटणी ६ महिन्यांनीं होईल. हप्त्यानें सर्टिफिकेटस घेणाऱ्यांनीं आतांच अर्ज करावेत. याशिवाय कंपनीची दर. म. दर. शें. ॥४ चार आणे व्याजानें रु. १०० ते २००० कर्ज अनुक्रम नंबरानें देण्याची नवीन योजना लवकरच सुरूं होऊन त्यांत **लवकर अर्ज करणारांस लवकर कर्ज मिळेल.**

एजन्सी कायमची व कमिशन भरपूर. त्वरा करा आणि प्रॉस्पेक्टस व एजन्सीसाठीं ॥= चीं तिकीटें पाठवा अगर भेटा.

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.**

हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई.

ब्रँचः—लक्ष्मी रोड, पुणें नं. २.



मुलामुलींकरितां नमुनेदार व उपयुक्त मासिक

## आनन्द

**वार्षिक वर्गणी-मोठा अंक २ रु. लहान अंक १ रु.**

जुलै १९३८ च्या खास अंकापासून ३३ वें वर्ष सुरूं. वर्गणीदार होऊन हें मासिक घेऊन पाहिल्याशिवाय त्याची खरी किंमत कळणार नाहीं. दरमहा नवे नवे पण उपयुक्त व आकर्षक विषय : उठावदार व स्पष्ट चित्रें : नव्या नव्या कल्पना व नवी नवी माहिती यांनीं प्रत्येक अंक सजविलेला असतो. जानेवारी १९३९ चा अंक अगदीं लहान मुलांसाठीं मोठ्या टाइपांत व आकर्षक दोन रंगांत काढणार आहोंत. जुलै १९३८ व जानेवारी १९३९ हे दोन खास अंक वरील वर्गणींतच वर्गणीदारांस मिळतील. पत्ता—आनंद कार्यालय, पुणें २.

## हिंदुस्थानापुढील आर्थिक प्रश्न

फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीज ही हिंदी व्यापार आणि उद्योगधंदे ह्यांचें हितसंवर्धन करणारी मध्यवर्ती संस्था आहे. देशाच्या हितास पोषक अशा धोरणांचा आणि कायद्यांचा पुरस्कार करणें आणि राष्ट्रविघातक कायद्यांचे विरुद्ध चळवळ करणें, हा तिच्या कार्याचा एक प्रमुख भाग आहे. सबंद हिंदुस्थानांतील एकूण सुमारें ४८ व्यापारी मंडळें फेडरेशनला सामील आहेत. त्यामुळें फेडरेशनच्या मतास महत्त्व प्राप्त होणें स्वाभाविक आहे. गेल्या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत फेडरेशनच्या कमिटीची बैठक मुंबई येथें भरली होती, त्यावेळीं हिंदी व्यापारी व कारखानदार वर्गांतील अनेक पुढारी उपस्थित होते. कमिटीनें चालू आर्थिक आणि औद्योगिक प्रश्नांची चर्चा करून कित्येक बाबींसंबंधानें आपलें मत व्यक्त केलें.

फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीजच्या सभासद संस्थांनीं, नवीन राज्यघटनेंतील मध्यवर्ती सरकाराविषयीं अनेक सूचना पाठविल्या होत्या त्यांचा विचार कमिटीनें केला. हिंदुस्थानास आपल्या परिस्थितीस योग्य असें आर्थिक धोरण आखण्याची मुभा नवीन घटनेमध्यें ठेवण्यांत आलेली नाहीं, ह्यासंबंधीं कमिटीनें तीव्र नापसंती दर्शविली. राजकीय स्वातंत्र्याच्या बरोबरच, इतकेंच नव्हे तर त्याच्या आधीच, आर्थिक स्वातंत्र्य मिळणें आवश्यक आहे;- इतर देशांप्रमाणें हिंदुस्थानास स्वदेशी व्यापार आणि उद्योगधंदे ह्यांचें संरक्षण करतांना विदेशींचें नियंत्रण करण्याचा अधिकार असला पाहिजे, व्यापारी हितसंबंधांविषयींची घटना-कायद्यांतील कलमें आमूलाग्र बदललीं पाहिजेत असा हिंदी व्यापारी वर्गाचा आग्रह आहे, इत्यादि गोष्टी कमिटीनें स्पष्टपणें नमूद केल्या. कमिटीनें स्वीकारलेलें हें धोरण सर्वांस संमत होईल यांत संशय नाहीं.

मोटार-वहानांबाबतच्या बिलानें मोटारींच्या वहातुकीवर नियंत्रण घालून हिंदी रेलवेजचें हित साधण्याचा यत्न चालविला आहे, हें निर्विवाद आहे. मोटार वहातुकीचें नियंत्रण रेलवेजचें उत्पन्न वाढविण्यासाठीच करण्यांत यावयाचें आहे, असें म्हणणें मात्र जरा धाष्टर्याचें होईल. कारण, वहातुकीच्या ह्या प्रकारानें अनेक नवे प्रश्न निर्माण केले आहेत, त्यांकडे ह्यापुढें दुर्लक्ष करणें समाजाच्या हिताविरुद्ध झालें असतें. फेडरेशनच्या कमिटीनें मोटार वहातुकीच्या नियंत्रणाची आवश्यकता मान्य केली आणि "थर्ड पार्टी" विम्याच्या योजनेचा अंतर्भाव बिलांत झाल्याबद्दल तिनें समाधान व्यक्त केलें. तथापि, एकंदरीनें पहातां, स्वस्त वहातुकीच्या साधनांचा उपयोग मर्यादित होऊन त्याचा फायदा रेलवेजना मिळावा, असाच बिलाचा रोख दिसतो, असा तिचा अभिप्राय पडला.

इनकमटॅक्स कायद्यांतील दुरुस्ती हा सध्या आणखी एक महत्त्वाचा विषय झाला आहे. प्राप्तीवरील करास लायक असणारानें आपण होऊन आपल्या उत्पन्नाचा तपशील सरकारास सादर केला पाहिजे, अशा अर्थाची योजना दुरुस्ती बिलांत अंतर्भूत आहे, तिला फेडरेशनच्या कमिटीचा विरोध आहे. बिलांतील इतर बाबींसंबंधींहि ( एकाच उत्पन्नावरील कराची दोनदा आकारणी, घसाऱ्याची तरतूद, परदेशांत मिळविलेल्या उत्पन्नावरील कराची आकारणी, हायकोर्टाकडील अपिलें इ. ) कमिटीनें आपलें मत व्यक्त केलें.

हिंदी मिठाच्या धंद्यास सरकारनें संरक्षण नाकारल्यास पुरे तीन महिने होण्याच्या आंतच मोठ्या प्रमाणावर विदेशी मिठाची आयात होऊं लागली आहे, ही गोष्ट चिंतनीय असून सरकारनें त्याबाबत सत्वर उपाययोजना केली पाहिजे, असा फेडरेशनच्या कमिटीचा आग्रह आहे. लिव्हरपूल आणि एडन येथून १३ हजार टन मीठ हिंदुस्थानाकडे येण्यास निघालें आहे, तें उतरूं न देण्याची सरकारनें तजवीज करावी, असें कमिटीनें सुचविलें आहे.

हिंदुस्थान आणि ब्रम्हदेश, इराण, झांझिबार, मोंबासा, डरबान ह्यांमधील टपालाचें कंत्राट तूर्त लांब मुदतीनें देऊं नये, कारण कांहीं वर्षांनीं देशी आगबोट कंपन्या हें काम करूं शकतील, असा कमिटीनें पोस्ट खात्यास दिलेला सल्ला उचित असाच आहे. रुपयाची कायदेशीर किंमत म्हणजे हुंडणावळ कमी करण्यास आपण तयार नाहीं, असें सरकारनें ता. ६ जून रोजीं जाहीर केलें, त्याविरुद्ध कमिटीनें आपलें मत नमूद करून युद्धाच्या पूर्वीचा दर पुन्हां चालू व्हावा अशी तिनें सरकारास आग्रहाची विनंति केली आहे.

फेडरेशनच्या कमिटीपुढील चर्चेच्या वरील रूपरेषेवरून कोणते महत्त्वाचे आर्थिक प्रश्न सध्या हिंदी व्यापारी आणि कारखानदार यांच्या पुढें आहेत ह्याची कल्पना येईल. औद्योगिक आणि आर्थिक बाबतींत हिंदुस्थानास स्वातंत्र्य मिळण्याची आवश्यकता ही ह्या सर्व प्रश्नांची पार्श्वभूमि आहे, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. हुंडणावळीचा दर हिंदुस्थानास समाधानकारकपणें निश्चित होण्याचें महत्त्व आज अनेक वर्षे प्रतिपादण्यांत येत असतांहि, त्याकडे सरकारनें दुर्लक्ष केलेलें आहे. आपल्या राजकीय सत्तेचे जोरावर सरकार कांहीं काळ आपला हक्क चालवण्याचा यत्न करील, परंतु परिस्थितीपुढें त्यासहि आज ना उद्यां नमावें लागेल, हें सांगावयास नको. आर्थिकच नव्हे तर इतरहि बाबतींत हिंदुस्थानांतील परिस्थितींत झपाट्यानें पालट होत आहे, त्यास अनुलक्षून सरकारनें आपलें धोरण आखणें मुत्सद्दीपणाचें होईल.

## झारापकर टेलरिंग कॉलेज

### सरकारी परीक्षेंत १०० टक्के पास

पुणें व दादर येथील सरकारमान्य झारापकर टेलरिंग कॉलेजच्या नुकत्याच झालेल्या सरकारी परीक्षेंत कॉलेजमधून बसलेले सर्व विद्यार्थी अत्यंत यशस्वी रीतीनें उत्तीर्ण झाले असून कॉलेजचा शे. १०० टक्के पास असा निकाल लागला हें कॉलेजच्या चालकांना अत्यंत भूषणावह आहे. आतांपर्यंत संस्थेच्या सुरवातीपासून झालेल्या सर्व सरकारी परीक्षांतून ह्या कॉलेजचा असाच निकाल लागलेला आहे व हें श्रेय मुंबई इलाख्यांत फक्त ह्याच कॉलेजनें मिळविलें आहे हें विशेष नमूद करण्यासारखें आहे. ह्या परीक्षेंत श्री. रामचंद्र तिमाजी गुंडा ( निपाणी ) हा विद्यार्थी पहिला आला असल्यामुळें त्याला बॅ. जमनादास मेहता सुवर्ण पदक देण्यांत आलें आहे.

## खेड व जुन्नर तालुक्यांतील शेतकी को. सोसायट्या

### अनेक प्रकारच्या सवलती

[ लेखक—श्री. के. डी. कुलकर्णी, सुपरवायझर, खेड (पुणें)]

शेतकरी लोकांवर वरचेवर अनेक प्रकारच्या अडचणी येऊं लागल्या व त्यांचें उत्पन्न व कर्ज यांचा एकमेकांशीं मेळ लागेना. यामुळें शेतकऱ्यांचें कर्ज कमी होणेचे ऐवजीं तें वरचेवर वाढूं लागलें. असाच चोहोंकडे अनुभव नजरेस येऊं लागला. हाच अनुभव को-आपरेटिव्ह सोसायट्यांमध्येंही नजरेस येऊं लागला. कर्जाचा व आजपर्यंतचा व्याजाचा बोजा देणें असलेला तो कमी करणेचे दृष्टीनें अनेक सद्गृहस्थांकडून, संस्थांकडून व काँग्रेस सरकारकडूनही कांहीं उपाय सुचविणेंत येत असलेले दिसून येत आहेत. को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांमधून सुद्धा शेतकऱ्यांचा सध्याचा असलेला व पुढील वाढता बोजा कमी करणेचे दृष्टीनें अनेक उपाय सहकारी खात्याकडून जाहीर करण्यांत आले आहेत. त्यांची अम्मलबजावणी शक्य तितकी जास्त चालू करणेचा प्रयत्न खेड व जुन्नर तालुक्यांत सुरू झाला असून त्याचा फायदा सोसायट्यांचे सर्व मेंबर्सनीं घ्यावा अशी विनंति करण्यांत येत आहे.

श्री. एन. पी. भागवत, असिस्टंट रजिस्ट्रार को. सो. मध्यभाग, पुणें यांनीं मागील महिन्यांत या भागांत दौरा काढून अनेक प्रकारच्या सवलती देणेबद्दल मंजुरी दिलेली आहे. त्यांपैकीं मुख्य मुख्य गोष्टी पुढीलप्रमाणें आहेत:—

१ चालू व्यवहाराचा कर्जदार; तुंबलेला कर्जदार; लवादी अगर बिनलवादी कर्जदार यांचेकडून येणें असलेल्या व्याजांत ५० टक्केपर्यंत सूट देणेचें ठरलें.

२ चालू व्यवहाराचे कर्जदारास नवीन कर्ज देणें झाल्यास सोसायटीच्या नेहमींचे व्याजाचे दरापेक्षां ३ पै दर कमी करून नवीन कर्ज देणेंत यावें.

३ तुंबलेले कर्जदारानें आपलेकडील व्याज वरील कलम १ प्रमाणें देऊन टाकलेनंतर मागील येणें राहात असलेले मुद्दल बाकीस योग्य व भरपूर तारण दिलेनंतर बाकीदाराचें उत्पन्न व त्याची पत लक्षांत घेऊनच ५ ते १० वर्षांपर्यंत हप्तेबंदी करण्यांत यावी.

४ संशयित कर्जदाराकडून येणें असलेले कर्जांत येणारा वसूल तूर्त सर्व मुद्दलांतच घेणेंत यावा.

५ ज्या सोसायट्यांना पूर्वीचा बराच तोटा असेल त्या सोसायट्यांमधून वरील योजना अमलांत आणतांना आणखी तोटा वाढणेचा फार संभव आहे. करितां सोसायटीची परिस्थिति सुधारेपर्यंत त्यांनीं सें. को. ब्यांकेकडून कमी व्याज आकारून घेणेबद्दल ब्यांकांना विनंति करावी.

६ ज्या कर्जदारांना मागील येणें रकमेबद्दल नवीन हप्तेबंदी पाहिजे असेल त्यांना सोसायटीचे नेहमीचे दरापेक्षां ३ पै प्रमाणें जास्त दरानें व्याज द्यावें लागेल.

७ रुपये ४०० आणि त्यावरील कर्ज असलेले इसमांनीं लँड मार्गेज बंकेकडून कर्ज मिळविणेबद्दल सोसायट्यांचे मार्फत एकत्रित मागणी करून त्यांना ही वरील कलम नं. १ मधील नमूद केलेले ५० टक्के सुटीचा फायदा देणेंत यावा.

८ ज्या इसमांच्या जमिनी कर्जफेडीमध्यें सोसायट्यांकडे आल्या त्या इसमांनींही सदर रकमेची हप्तेबंदी करून घेऊन जमिनी परत घेणेंत याव्या.

९ वरील सर्व गोष्टींचा अंमल सध्या चालू झाला असून त्याची मुदत डिसेंबर १९३८ अखेरपर्यंत व कांहीं ठिकाणीं मार्च १९३९ अखेरपर्यंत ठरविणेंत आली आहे.

१० याशिवाय अनेक प्रकारच्या शंका अगर सवलती वगैरेबाबत कांहीं विचारणें झाल्यास त्याबद्दल खेड येथील को. सुपरवायझिंग यूनियनचे ऑफिसांत अगर खेड येथील सेंट्रल बँकेच्या ऑफिसांत येऊन माहिती घेणेंत यावी.

येणेंप्रमाणें ढोबळ मानानें सवलतींची रूपरेषा सर्व शेतकरी मेंबरांच्या नजरेस आणली आहे. सदर योजनेंत तुंबलेले व चालू कर्जदारास व तसेंच संशयित कर्जदारासही फार फायदा होणार असून वरील कलम नं. ९ मध्यें नमूद केलेले मुदतीपर्यंत या संधीचा जरूर फायदा घेणेंत यावा अशी विनंती आहे.

को-आपरेटिव्ह सोसायट्यांमधून या व अनेक प्रकारच्या सवलती चालू असून त्यांबद्दल कांहीं माहिती विचारणें झाल्यास त्याची पूर्ण माहिती असलेल्या संस्थेकडूनच माहिती घेणेंत यावी. अर्धवट माहिती असलेले इसमाकडून माहिती बरोबर न मिळणें संभवनीय असल्यामुळें कांहीं तरी विपरीत अर्थ करून घेणें योग्य होणार नाहीं. तरी याबद्दल पूर्ण माहिती घेऊनच अवश्य फायदा घेण्यांत यावा.

को-ऑपरेटिव्ह सोसायट्या या सर्वस्वी शेतकरी लोकांच्याच असलेमुळें त्यांना येत असलेल्या सर्व प्रकारच्या अडचणी आपल्या योग्य अशा संस्थेमार्फतच मांडून सोडवून घेतल्या पाहिजेत. सोसायट्यांच्या कामकाजाबद्दल, व्यवहाराबद्दल वगैरे पूर्ण माहिती बऱ्याच मंडळींना नसलेमुळें प्रमुख मंडळींचाही सोसायट्यांच्या कामकाजाबद्दल निष्कारण गैरसमज उत्पन्न होतो असा अनुभव आमचे निदर्शनास येत आहे. काँग्रेसमधील स्थानिक चालक मंडळींनीं को-आपरेटिव्ह सोसायट्यांचे कामकाजाबद्दल पूर्ण माहिती करून घ्यावी, वाटाघाट करावी व त्यांस योग्य असें वळण देऊन सोसायट्यांचे मार्फत ठिकठिकाणच्या मोठमोठ्या शेतकरी वर्गास ऋणमुक्त करून देणेचे दृष्टीनें मदत करावी. को-आपरेटिव्ह सोसायट्यांना सावकारशाही समजणें म्हणजे सोसायट्यांच्या कामकाजाबद्दल त्यांनीं पूर्ण माहिती करून घेतली नाहीं असेंच समजणें होय असें आम्हास वाटतें. तरी ठिकठिकाणचे स्थानिक काँग्रेस पुढारी मंडळींनीं वरील सवलतींचे योजनेस पाठिंबा देऊन शेतकऱ्यांना जरूर मदत करावी असें आमचें आग्रहाचें सांगणें असून तशी मदत करणेंबद्दल विनंति करणेंत येत आहे.

इकडचे भागांतील शेतकऱ्यांचे इतर पुढारी मंडळींनींहि वरील योजनेस पाठिंबा देऊन शेतकऱ्यांना ऋणमुक्त करून देणेचे दृष्टीनें जरूर मदत करावी अशी विनंति आहे.


पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठीं भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.

पूना
गेस्ट हाउस
टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड—गणपति चौक—पुणें.

हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य

### औंध संस्थानांत जमीन साऱ्यांत सूट

गेलीं कांहीं वर्षे जागतिक आर्थिक मंदी उत्पन्न होऊन शेतकींतील पदार्थांचे बाजारभाव बरेच उतरले आहेत व शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिति खालावली आहे. यासाठी शेतकऱ्यांस हल्लींची आर्थिक परिस्थिति सुधारेपर्यंत जमीनसाऱ्यामध्यें सूट देणें आवश्यक असल्यानें औंधचे राजेसाहेब संस्थानचे गादीवर आल्यापासून (म्हणजे सन १९०९ सालापासून) सर्व्हेचे नियमाप्रमाणें आजपर्यंत निरनिराळ्या तालुक्यांत जी सारावाढ झाली आहे, ती हल्लीची आर्थिक स्थिति सुधारेपर्यंत खालीलप्रमाणें त्यांनीं तालुकेवार कमी केली आहे.

| तालुक्याचें नांव | रि. सर्व्हे झालेलें साल | जमीन साऱ्यांत तालुकवार झालेली वाढ कमी करणेची ती हल्लींचे साऱ्याचे सरासरी शेकडा टक्के. |
|---|---|---|
| आटपाडी | १९१३–१४ | ११ |
| कुंडल | १९२५–२६ | २९ |
| गुणदाळ | १९२४–२५ | २८ |
| औंध | १९२५–२६ | २३ |

याप्रमाणें सारा कमी करून रिव्हिजन सर्व्हेमुळें सरकारी साऱ्यांत जी वाढ झाली आहे, ती सर्व अंदाजी रु. ५१,००० माफ करणेंत येत आहे. याशिवाय इनामगांवचे रयतेसहि याच प्रमाणांत रिव्हिजनमध्यें वाढलेले साऱ्याची सूट मिळणेंची आहे, ती निराळी आहे. सरकारी जमीनसाऱ्याची एकंदर संस्थानची सरासरी सूट शेकडा २२·७ टक्के पडत आहे.

संस्थानांत फॉरेस्ट म्हणून जी जमीन आहे, ती गांवचे जनावरांस चारणेसंबंधीं सरकारांतून जे नियम करणेंत येतील, त्यांस पात्र राहून मोफत चारणेसाठीं खुली करणेंत येत आहे. खिल्लारांचे उपयोगासाठीं व झाडें लावणेकरितां वगैरे जें आटपाडी तालुक्यांतील कुरणाचें क्षेत्र राखीव आहे, तें मात्र यापुढेंहि हल्लींप्रमाणें राखीव राहील.

---

### जाधव टेलरिंग कॉलेज, पुणें.

पुणें येथील "जाधव कॉलेज ऑफ टेलरिंग ॲण्ड कटिंग" या संस्थेंतील विद्यार्थ्यांची परीक्षा, कमिटी ऑफ डायरेक्शन फॉर टेक्निकल एज्युकेशन बॉंबे प्रेसिडेन्सीतर्फे घेणेंत आली. या परिक्षेंत सर्व विद्यार्थी सेकंड क्लासमध्यें पास झाले. त्यांचीं नांवें खालीलप्रमाणें आहेत:—

१ मोमिन एम. एफ. [ पुणें ] २ पराडकर जे. जी. [ कोल्हापूर ] ३ डिके एम. के. [ ठाणा ] ४ गडकरी एस. बी. [ पुणें ] ५ देसाई ए. एम. [ खेडा ] ६ शाहा सी. बी. [ काठीयावाड ] ७ वूड जे. इ. [ आजमेर ] ८ सौ. चंचलाबेन देसाई [ अहमदाबाद ] ९ युसफ महमद [ राजगड ] १० परदेशी बी. आर. [ ठाणा ] ११ परमार व्ही. जे. [ कच्छभुज ] १२ नाफडे बी. आर. [ इंदोर ].

---

### हिंदी साखरेच्या उत्पादनाचा अधिकृत अंदाज

| | १९३६–३७ | १९३७–३८ (अंदाज) |
|---|---|---|
| उत्पादन ( टन ) | ११ लक्ष, ११ हजार | ९ लक्ष, ६८ हजार |
| चालू कारखाने (संख्या) | १३७ | १४१ |
| गाळलेला ऊंस ( टन ) | ११६ लक्ष ८७ हजार | १०३ लक्ष, २९ हजार |
| उतारा ( % ) | | |
| साखर | ९·५० | ९·३८ |
| मोलॅसेस | ३·४८ | ३·७२ |


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १६ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १७ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १८ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १९ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २० शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २१ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २२ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २३ साक्री ( „ „ ) |
| ९ भिवंडी ( „ „ ) | २४ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २५ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २६ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २७ सटाणा ( „ „ ) |
| १३ वाई ( „ ठाणें ) | २८ कळवण ( „ „ ) |
| १४ पालघर ( „ „ ) | २९ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १५ कल्याण ( „ „ ) | ३० कालोला |

## खेळतें भांडवल रु. २०००००० चेवर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जे दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## ग्रामोद्योगाला सरकारकडून मिळालेली मदत

(२)

### २ शिष्यवृत्त्या

सरकारनें मंजूर केलेल्या शिष्यवृत्तीच्या रकमेंतून हातानें कागद बनविण्याच्या क्रियेचें शिक्षण देण्यासाठीं ९ विद्यार्थ्यांची निवड करण्यांत आली व त्यांना वर्धा येथें फेब्रुवारीपासून पाठविण्यांत आलें. हा अभ्यासक्रम फक्त चार महिन्यांचा होता. ह्या विद्यार्थ्यांसाठीं वर्धा येथील विद्यालयांत विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा, रहाण्याचा व भोजनाचा खर्च म्हणून ४ महिन्यांचे रु. ५८५ देण्यांत आले.

तेलघाणीचें शिक्षण देण्यासाठी दहा विद्यार्थ्यांची निवड करण्यांत आली होती व त्यासाठी सरकारनें ५१० रु. मंजूरहि केले होते व ती रकम सरकारनें संघाला दिली होती परंतु वर्धा येथें त्या वेळेस उन्हाळ्यास सुरवात झाल्यानें व ह्या बाजूचे विद्यार्थ्यांना तेथें रहाणें त्रासदायक होईल म्हणून विद्यार्थ्यांना पाठवूं नये असें वर्ध्याहून पत्र आल्यानें ही रकम सरकारकडे परत केली.

### ३ तेलघाण्या

ह्या कामासाठी सरकारनें ५५० रु. मंजूर केले होते. वर्धा येथें बनविलेली सुधारलेल्या पद्धतीची घाणी बेळगांव येथें भरणाऱ्या शेतकी प्रदर्शनांत तयार करून ती चालवून दाखविण्यासाठीं वर्ध्याहून मिस्त्री पाठविण्यांत आला. त्यासाठीं त्याचा जाण्यायेण्याचा खर्च व पगार वगैरे मिळून रकम रु.८९-९-६खर्च झाले. ह्या सुधारलेल्या पद्धतीच्या तेल घाणीची माहिती व तिच्या निरनिराळया लहान भागांतले नमुने पाहून महाराष्ट्रांत व कर्नाटकांत एकूण आठ केंद्रीं स्थानिक कारागिरांकडून तेल घाणी बनविण्याचें स्थानिक कार्यकर्त्यांनीं ठरविलें. अशा केंद्रांस मदत म्हणून प्रत्येक केंद्रास चाळीस रुपयांप्रमाणें एकूण ३२० रुपये खर्च झाले.

### ४ ग्रामोद्योग वस्तूंचें शास्त्रीयरीत्या परीक्षण व पृथक्करण

ग्रामोद्योग संघाच्या कार्यकर्त्यांकडून निरनिराळया पदार्थांचें शास्त्रीय परीक्षण व पृथक्करण करावयाचें असल्यास तें विनामूल्य पुणें शेतकी कॉलेजमधील सरकारी केमिस्टमार्फत केलें जाईल अशी सवलत सरकारनें दिली ती सर्व कार्यकर्त्यांना कळविली होती. त्याप्रमाणें गेल्या अवधींत जे नमुने आले त्यांचें पृथक्करण पुणें शेतकी कॉलेजमधील केमिस्ट ह्यांनीं विलंब न लावतां करून दिलें हें स्तुत्य आहे.

### ५ निरनिराळीं पत्रकें प्रसिद्ध करणें

१९३७-३८ साली, कलकत्ता येथील बंगालमधील हरिजन सेवक संघांतील कार्यकर्ते श्री. सतीशचंद्र दास गुप्त यांनीं लिहिलेल्या " क्रोम टॅनिंग फॉर व्हिलेजिस् " नामक एका लहानशा पुस्तकाचे मराठी, गुजराथी व कानडी ह्या भाषांत रूपांतर करून तें छापण्यासाठीं ह्या रकमेचा विनियोग करण्यांत आला. छपाई खर्च एकूण २२८ रु. व भाषांतर करण्याचा खर्च ५५ रु. इतका झाला.

---

### स्वस्त विवाह

ग्रेटब्रिटनमध्यें दरसाल तीन लक्षांहून अधिक विवाह होतात. शंभर वर्षांमागें सर्वांचे विवाहविधि चर्चमध्यें उरकले जात असत. आतां शेकडा तिसापेक्षां अधिक विवाह नोंदणी पद्धतीनें होतात. ह्याचा अर्थ,विवाहांचा व्यवहार चर्चचे हातांतून जाऊन सरकारचे ताब्यांत जात आहे. विवाहांवर होणाऱ्या खर्चांत त्यामुळें बचत होऊन पांच रुपयांत विवाहास कायदेशीरपणा येऊं शकतो. चर्चमध्यें लग्न केल्यास पंचवीस रुपयांपर्यंत खर्च येतो. ग्रेट ब्रिटनमधील मध्यम वर्गातील मनुष्याच्या लग्नास सरासरीनें सत्तर रुपये खर्च लागतो.


Very useful for Central and Urban Co-operative Banks and Societies.

**" URBAN BANKS "**

BY

L. K. BHAGWAT,

*Chief Accountant,*

**Bombay Provincial Co-operative Bank, Ltd.**

The book written in English, besides fully, describing the structure and functions of all types of Urban Banks, supplies practical hints to actual workers on the proper conduct of their day to day business including maintenance of accounts and records, cheques, endorsements, bills, audit, annual closing &c. **Principal Tannan** remarks in his foreword: "The book will show the reader the way to keep the co-operative house in the order expected of it. " Price Rs. 2. Postage extra. Copies can be had from L. K. Bhagwat. Vincent Road, Plot No. 168 A, Dadar, Bombay 14.



**CONFIDENCE**

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

**YEARS OF**

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

**PUBLIC CONFIDENCE**

The following figures will convince you :

**NEW BUSINESS**

**Last year 1936-37**

**Exceeds**

**2 CRORES & 82 LAKHS**

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

On Endowment **Rs. 23** | On Whole Life **Rs. 20**

**HINDUSTHAN**

**Co-operative Insurance Society, Ltd.**

( ESTD. 1907 )

*Branches* : Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Office* : throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,

MANAGER : Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## निवडक बाजारभाव

**बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून )** ३%

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | ११८—२ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन | १०३—७ |
| ४% १९४३ | १०८–१० |
| ३½% बिनमुदत | ९९—४ |
| ३½% १९४७–५० | १०६—६ |
| २¾% १९४८–५२ | १००—५ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १११—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०९–१२ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९–१२ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) | ११२—४ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२४—४ |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आंकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% | १४२–१२ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | ११५—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% | ३१—४ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% | १५५०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ६% | ६०—० |
| ग्रिन्डलेज बँक ( १०० ) ३½% | ११७—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% | १०२—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% | ९६—४ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९८५—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% | ७४०—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% | ११५—८ |
| कराची ( १०० ) ९% | २१०—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | १९६—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १३६५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १४५०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. | १६२—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ४०—४ |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. | २०–१२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–९५ ) १ रु. | ४८—० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ४३४०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २०१–१४ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. | १५५—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. | २५८—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै | १२१५—० |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ३५–११–० |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास | ५०–६–० |



अखिल हिंदुस्थानांत पहिल्या
प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
झारापकर टेलरिंग
कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

घरच्या घरीं संगीत कलेंत प्राविण्य मिळविण्यास
सर्वोत्कृष्ट–सचित्र–सुबोध–माहितीपूर्ण
संगीत–मार्गदर्शक
मालेचीं पुस्तकें.
गायन — किं. ६ आ.
हार्मोनियम — किं. २॥ रु.
दिलरुबा — किं. १ रु. २ आ.
फिडल — किं. १ रु. ४ आ.
व्ही. पी. नें चार आणे जास्त पडतील.
प्रभा संगीत विद्यालय, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणें ४.

सुप्रसिद्ध तुळजाराम मोदी
यांचे पेढे व बर्फी वापरा
मोती चौक : : : सातारा

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.
एरोप्लेन प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६९५ सदाशिव पेठ.

'अभिनंदनीय प्रगति' असेच बोल नाशिकच्या सह्याद्रि विमा कंपनीबद्दल सर्वांच्या तोंडून निघत आहेत. किमान हप्ते, चोख व्यवस्था, वजनदार संचालक, कर्तबगार प्रतिनिधी व आकर्षक योजना वगैरे अनेक सर्वोत्तम गोष्टी याच संस्थेत आहेत. पॉलिसी किंवा एजन्सी घेण्यापूर्वी आमचा सल्ला घेण्यास चुकूं नका. ठिकठिकाणीं पगार व कमिशनवर प्रतिनिधि पाहिजेत.
लिहा अगर भेटा. | मॅनेजिंग डायरेक्टर

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत मांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें मांडवल ५,००,०००
खपलेलें मांडवल २,३४,४५० वसूल झालेलें मांडवल १,१७,१६५

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढतां येतात. या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मार्फत कमिशनशिवाय वसूल केले जातात. बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअर बद्दल बँकेकडे चौकशी करावी.

M. V. GOKHALE,
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

अप-टु-डेट शिलाई करतां

## महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा

बुधवार चौक, पुणें १२ तासांत कपडे शिवून मिळतील. [ खादी भांडाराचे माडीवर

## पराडकर टेलर्स ॲकॅडिमी

( सिटी पोस्टासमोर पुणें २ )
येथें शिवणकलेचें शास्त्रीय व व्यावहारिक धंदेशिक्षण फीसुद्धां सर्व खर्च मिळून फक्त ११० रु. त पूर्ण खात्री होईपर्यंत मिळतें.

INDUSTRIAL SOCIETY

## WORK SHOP

Furniture on Hire on Reasonable Terms

Any kind of plain or fancy Wooden and Iron Furniture can be made to order and delivered in the shortest possible time.

Old Furniture also can be bought or sold on commission.

**SHEVAK BROS** 153 Kasba, POONA Near Ganpati Temple

Branch No. 1—Fergusson Road.

FOR SAFETY, ECONOMY AND DURABILITY Consult

## V. G. & Sons

ELECTRICAL and RADIO ENGINEERS AND LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

## रु. १४,५०० आणि त्याखेरीज नफा.

वार्षिक हप्ता रु. १७५ भरून दरमहा रु. ४१-१०-८ वीस वर्षेंपत मिळून त्याखेरीज रु. ५०००।— रक्कम व नफा मिळेल. भरलेल्या हप्त्यावर शे. ९ टक्के व्याज.

एम्. कानजी ॲण्ड कंपनी, मॅनेजिंग एजन्टस् एस. सूर्यराव आणि कंपनी, महाराष्ट्राचे मुख्य एजन्टस्

**धी युनिव्हर्सल फायर ॲण्ड जनरल इन्शुअरन्स कंपनी लि.,** लक्ष्मीरोड, पुणें.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.